# 2019-2020

3.6.1 – Number of extension and outreach programmes conducted in collaboration with industry, community and Non- Government Organisations through NSS/NCC/Red cross/Youth Red Cross (YRC) etc., during the year.

| Title of the activities | Organising unit/agency/ collaborating agency | Number of teachers participated in such activities | Number of students participated in such activities |
|---|---|---|---|
| Tree plantation program at adopted village Vaigaon | NSS unit of Degree College of Physical Education and Sant Gadge Baba Amravati University, Amravati. | 38 | 130 |
| Participation in Ambadaspant Vaidya Memorial Blood Donation Camp | NSS unit of Degree College of Physical Education | 28 | 125 |
| Organization of Fit India Fogging Race on the occasion of Mahatma Gandhi Jayanti | NSS unit of Degree College of Physical Education | 68 | 1000 |
| AIDS awareness campaign | NSS unit of Degree College of Physical Education and Red Ribin Club. | 15 | 175 |
| Participation in cleaning campaign in Ijtema | NSS unit of Degree College of Physical Education | 07 | 100 |

| | | | |
|---|---|---|---|
| Organization of Aadhaar card correction and renewal camp | NSS unit of Degree College of Physical Education and Indian Postal Service, Amravati. | 14 | 230 |
| Participation in Rukmini Mahotsav, Kandanyapur 2020 | NSS unit of Degree College of Physical Education and Sant Gadge Baba Amravati University, Amravati. | 17 | 100 |
| Participation in state level republican road management | NSS unit of Degree College of Physical Education | - | 01 |
| Fit India Walkathon | NSS unit of Degree College of Physical Education | 12 | 90 |
| Blood donation camp on the occasion of Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti | NSS unit of Degree College of Physical Education | 17 | 450 |
| Participation in District Level National Service Scheme Camp | NSS unit of Degree College of Physical Education | 12 | 123 |

**दत्तक ग्राम वायगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम**




दि. १७ ऑगस्ट २०१९ रोजी दत्तक ग्राम वायगाव येथे डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे वृक्षारोपण कार्यक्रम वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री मा. अनीलजी बोर्ड साहेब, अमरावती विद्यापीठ रा.से.यो संचालक प्रा. डॉ. राजेशजी बुरंगे. संस्थेच्या सचिव डॉ. माधुरीलाई डि.सी.पी.ई. चे प्राचार्य मा डॉ. के. के. देवनाथ यांची उपस्थीती लाभली. यावेळी मा. ना. अनोलजी बोंडे साहेब यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना वृक्षारोपणाचे महत्त्व जिवन जगण्यासाठी वृक्षाची काय आवश्यकता आहे याची जाणीव करून दिली व त्यांच्या हस्ते वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले व मंदीराच्या शेत परिसरामध्ये वृक्षारोपण सुध्दा करण्यात आले. त्यानंतर रा.सं.यो स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांद्वारे ५० रोपट्यांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच यावेळी डॉ. राजेश सुरंगे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेद्वारा राबविण्यात येणा-या वृक्षारोपणाची माहिती दिली. या प्रसंगी रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. संतोष इंगोले, प्रा. डॉ. फिरण गायकवाड, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष स्टेकर, प्रा. डॉ. सुभाष चव्हाण. प्रा. डॉ. संजय तिरथकर प्रा. सुरज यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**स्व. अंबादासपंत वैद्य स्मृती रक्तदान शिबीरामध्ये सहभाग**




९ सप्टेंबर २०१९ रोजी श्री ह. व्या. प्र. मंडळाचे आद्य संस्थापक गुरुवयं स्व. अंबादासपंत वैद्य स्मृती दिनानिमित्य मंडळाच्या अनंत क्रिडा मंदिर आंतर सभागृहात पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असता कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ उद्घाटक म्हणून विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. सुरेश देशपांडे, संस्थेचे ज्येष्ठ कार्यकते श्री. वामनराव तायडे, रक्तदान समितीचे अध्यक्ष श्री. महेंद्र भुतडा, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके डॉ. वैष्णवी भुजाडे, डॉ. कल्याणी देशमुख यांच्या प्रमुख उपस्थीती होती. उद्घाटन भाषणात मा. डॉ. तुषार देशमुख यांनी रक्तदान हे जीवनाचं श्रेष्ठदान आहे असे सांगून विद्याथ्यांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रम प्रसंगी या अगोदर रक्तदान केलेल्या महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद व विद्यार्थ्याचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. याप्रसंगी डि.सी.पी.ई च्या १२५ विद्यार्थ्यांनी रक्तदान करुन सेवाकार्यामध्ये योगदान दिले. या कार्यक्रमाच्या यशस्वी कार्यक्रमाकरीता रा. से. यो कार्यक्रम अधिकारी प्रा. महेंद्र लोणकर, प्रा. डा. किरण गायकवाड, प्रा. मनोज कोहळे, महाविद्यालयीन प्रा. संतोष इंगोले, प्रा. डॉ. मधुकर बुरणसे. प्रा. आशिष हरेकर, प्रा. राजेश पांडे व प्रा. डॉ. संजय तिरथकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**महात्मा गांधी जयंती निमित्य फिट इंडिया फॉगींग रेस चे आयोजन**

दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधा व लाल बहादुर शास्त्री यांच्या जयंती निमित्य डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशनच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे स्वच्छ भारत अभियान रैली काढण्यात आली. यामध्ये कॉलेजच्या तसेच चाइल्ड लाईनच्या व योग विभागाच्या १००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी सर्वप्रथम स्वच्छ व सुंदर भारत बनवण्यासाठी नारा देवून प्लास्टीक निर्मुलन करुन उपस्थीत मान्यवर विद्यार्थी व शिक्षक वृंद यांनी शपथ घेतली. यावेळी उद्घाटक म्हणून मा. श्री. संजयजी निपाने, मा. आयुक्त म.न.पा. अमरावती, मा. जाधवजी आरोग्य विभाग. अमरावती. डि.सी.पी.ई. चे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात करण्यात आली. हि रॅली श्री ह.व्या. प्र. मंडळाच्या प्रांगणातून गांधी चौक, श्याम चौक, जयस्तंभ चौक, जुना मोटर स्टॅन्ड ते श्री ह.व्या.प्र मंडळ येथे रॅलीची समाप्ती करण्यात आली. यावेळी गाडगेबाबा, सावित्रीबाई फुले यांच्या वेशभुषा करुन समाजाला स्वच्छ भारताकरीता संदेश देण्यात आला पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. रॅलीमध्ये संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चंडके. डॉ. सुर्यकांत पाटील, डॉ. संजय तिरथकर, डॉ. सुभाष चव्हाण. रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष हटेकर. प्रा. जयंत इंगोले, प्रा. डॉ. प्रमोद भालेराव, प्रा. डॉ. किरण गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**एड्स जनजागृती अभियान**




दि. १४ डिसेंबर २०१९ रोजी एड्स जनजागृती यावर डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन व राष्ट्रीय सेवा योजना रेड रिबन क्लब द्वारा डि.सी.पी.ई. च्या ऑडीओटोरीयम हॉलमध्ये व्याख्यान घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डि.सी.पी. ई चे प्राचार्य डॉ. के. के. देवनाथ तर प्रमुख वक्ते म्हणून गव्हमेंट टि.बी. हॉस्पीटलचे मा. श्री. नितीन बेदरकर हे उपस्थीत होते. यावेळी श्री. नितीन बेदरकर यांनी एड्स बद्दलची लक्षणे व त्याची दक्षता यावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. यावेळी रेड रिबन क्लबची सुध्दा स्थापना करण्यात आली. यावेळी डि.सी.पी. ई. चे उपप्राचार्य प्रा. डॉ. एस. पी. देशपांडे, प्रा. डॉ. सूर्यकांत पाटील. प्रा. डॉ. प्रमोद भालेराव. प्रा. डॉ. संजय तिरथकर, रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष व्हटेकर, प्रा. डॉ. किरण गायकवाड तसेच महाविद्यालयीन कर्मचारी उपस्थीत होते.

**इज्तेमा मध्ये सफाई अभियानामध्ये सहभाग**

दि. २८ डिसेंबर २०१९ रोजी नांदगाव पेठ. सावर्डी येथे तिन दिवसीय आलमी इज्तेमा चे आयोजन मुस्लीम बांधवातर्फे करण्यात आले. त्यावेळी इज्तेमा समाप्तीनंतर सफाई अभियानामध्ये हव्या. प्र. मंडळ डि.सी.पी. ई राष्ट्रीय सेवा योजनाचे पथकाद्वारे व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या हेल्पलाईन व मुस्लीम हेल्पलाईनचा सहभाग घेण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनाच्या १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून मुस्लीम बांधवांना मित्रत्वाचा संदेश देण्यात आला. हे सर्व मोलाचे कार्य ह.व्या.प्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकररावजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली

करण्यात आले. यावेळी रा.से.यो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष हटेकर व प्रा. ललीत शर्मा यांचे सहकार्य लाभले.

**आधार कार्ड दुरुस्ती व नुतनीकरण शिबीराचे आयोजन**



दि. ६ ते १८ जानेवारी २०२० रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन राष्ट्रीय सेवा योजना व भारतीय डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आधार कार्ड दुरुस्ती व नुतनीकरण शिबीर श्री ह.व्या. प्र मंडळाच्या हरिहर व्यायाम गृहा मध्ये घेण्यात आले. शिबीराचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपआपले आधार कार्ड दुरुस्त व नूतनीकरण करून घेतले. यावेळी आधार कार्ड शिबीराचेउद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डाक विभागाचे अधिकारी श्री. साहू साहेब, श्री. सुतवणे साहेब व श्री. यावले साहेब यांचे चांगले मार्गदर्शन लाभले. यावेळी या कार्यक्रमाला प्रा. डॉ. टॉमी जोश. प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. डॉ. प्रमोद भालेराव, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. आशिष हटेकर. प्रा. मनोज कोहळे, प्रा. डॉ. किरण गायकवाड व इतर नागरीक उपस्थीत होते.

**रुक्मीणी महोत्सव, कौंडण्यपूर २०२० मध्ये सहभाग**





दि. १७ जानेवारी २०२० रोजी रुक्मीणी संस्थान, कौंडण्यपूरच्या वतीने रुक्मीणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असता संस्थेच्या बतीने रुक्मीणी मंदीर ते संपुर्ण गावामध्ये इतर प्रांतातील सर्व साधुसंतासह रैलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ग्रामस्थ मंडळी व डि.सी.पी.ईच्या रा.से.यो पथकांच्या १०० विद्याथ्र्यांनी सहभाग घेतला व संपुर्ण सोहळ्यामध्ये भोजन व इतर व्यवस्थेमध्ये श्रमदान देवून मोलाचे कार्य केले. यावेळी रा.से.यो स्वयंसेवकासह महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद प्रा. डॉ. उदयजी मांजरे, प्रा. डॉ. विटाळकर, प्रा. डॉ. दिनानाथ नवाथे. एन. एस. एस. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. मनोज कोहळे यांनी या महोत्सवात सहभागी होऊन मोलाचे कार्य केले.

**राज्यस्तरीय प्राजसत्ताक पथसंचालनात सहभाग**



दि. १७ जानेवारी ते २६ जानेवारी २०२० या कालावधीत स्पोर्टस् कॉम्प्लेक्स विद्यानगरी, कालीना, सांताक्रुज पूर्व, मुंबई येथे रा.से.यो उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन. मुंबई यांच्या वतीने राज्यस्तरीय प्रजासत्ताक पथसंचालन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये महाविद्यालयीन रा.से.यो स्वयंसेवक चेतन दवंडे यांची निवड झाली असता त्यामध्ये त्याने उत्कृष्ट सहभाग दर्शवीला. त्याकरीता त्याला महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. के. के. देबनाथ. प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. डॉ. किरण गायकवाड व प्रा. संतोष इंगोले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**फिट इंडीया वॉकेथॉन**





दि. १८ जानेवारी २०२० रोजी डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे फिट इंडीया वॉकेथॉन चे आयोजन श्री ह.व्या.प्र. मंडळाच्या प्रेरणास्थळ येथून करण्यात आले. या वॉकेथॉनला हिरवी झेंडी संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. देबनाथ यांनी दाखवली. फिट इंडीया वॉकेथॉनमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशनचे सर्व विद्यार्थी. विद्यार्थीनी आणि कॉलेजच्या सर्व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. यामध्ये डॉ. के. के. देवनाथ, प्राचार्य डि.सी.पी.ई. यांनी वॉकेथान बद्दल सर्व विद्याथ्र्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. प्रमोद भालेराव, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर, प्रा. मनोज कोहळे, प्रा. आशिष हटेकर, प्रा. डॉ. सुभाष चव्हाण, प्रा. डॉ. मधुकर बुरनासे, प्रा. सुरज बाखडे, प्रा. संजय हिरोळे, डॉ. दिनानाथ नवाथे, डॉ. उदय मांजरे. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. किरण गायकवाड व प्रा. नाहीद परवीन यांचे सहकार्य लाभले.


**छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्य रक्तदान शिबीराचे आयोजन**

दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालीत डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशन, राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे व अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाराजांच्या ३९३ व्या जयंती निमित्य भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीराचे उद्घाटन डि.सी.पी. ई. चे प्राचार्य

डॉ. के. के. देबनाथ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. मराठे, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांच्या हस्ते करण्यात आले. शिबीराचे आयोजन ह.व्या.प्र. मंडळाच्या अनंत क्रिडा मंदिरामध्ये करण्यात आले असता डिग्री कॉलेज ऑफ फिजीकल एज्यूकेशनच्या व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १०० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. शिबीर यशस्वीतेकरीता डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या चमूचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरीता प्रा. राजेश पांडे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. संजय तिरथकर, प्रा. डॉ. विजय पांडे, प्रा. डॉ. दिपक फडणीस, प्रा. डॉ. मधुकर बुरनासे. एन. एस. एस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. महेंद्र लोणकर व प्रा. आशिष हटेकर, महाविद्यालयीन विद्यार्थी पुष्पक खोंडे, आदित्य पुंड, अंकांत कुमार. शुभम ठाकरे, राधीका खडसे या विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाकरीता रक्तदान चळवळीचे कार्यकर्त श्री. अजय दातेराव. श्री. महेंद्रजी भुतडा ही मंडळी प्रामुख्याने उपस्थीत होती.

**जिल्हास्तरीय राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये सहभाग**





दि. २१ ते २८ फेब्रुवारी २०२० रोजी बोरी, ग्राम - ज्ञानपीठ, लवादा, ता. धारणी, जि. अमरावती येथे "स्वच्छ भारत व स्वस्थभारत" या अभियाना अंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशाप्रमाणे विद्यापीठ स्तरीय जिल्हा शिबीराचे आयोजन करण्यात आले असता महाविद्यालयीन दोन रा.से.यो. स्वयंसेवक १) कु. भावना जयस्वाल, २) आकाश ब्रिजलाल उईके यांचा यशस्वी सहभाग होता. तसेच डि. ग्री. कॉलेज ऑफ फिजिकल एज्यूकेशनच्या राष्ट्रीय सेवा योजनाचे महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. किरण गायकवाड यांनी ऍरोबिक्सचे प्रशिक्षण दिले व प्रा. मनोज कोहळे यांनी सहभागी होऊन योगासन प्राणायामाचे प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले.

PRINCIPAL
Degree College of Physical Education,
AMRAVATI. (M. S.)